PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 7, ISSUE 5

# भाव कवितेचे स्वरूप

**डॉ. यशोद श्रीमंतराव पाटील**
**सहयोगी प्राध्यापक**
**(मराठी विभाग)**
**विवेकानंद कला, सरदार दलिपसिंग**
**वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,**
**समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर.**
**(महाराष्ट्र) ४४१९०४**

## प्रस्तावना :

अधिष्ठान भावना आहे. मानवी भावनेतून भावकवितेचा उदय झाला. भावकवितेच्या उत्स्फुर्ततेत, उत्कटतेत आणि भावतल्लीनतेत सामावलेली असल्याचे आढळून येईल. भावकवितेची अंतर्गत संघटना साधणारे सगळे घटक मूलत:च परस्परांशी त्यांच्या अंगभूत गुणवैशिष्ट्यांनी निगडीत असलेले दिसून येतात. भावकवितेच्या स्फुट आकाराचे नाते तिच्यात असलेल्या विशिष्ट प्रकारच्या उत्कृष्टतेशी आहे. कोणत्याही तऱ्हेची तीव्रता वा उत्कटता ही मनाची अल्पकाळ टिकणारी अवस्था असते, हे एक मानसशास्त्रीय सत्य होय. साहजिकच भावकवितेचे रूप आकाराने छोटे घडविण्यात या उत्कृष्टतेचा महत्त्वाचा सहभाग असतो. या उत्कटतेचा उगम व्यक्तिमनाच्या विशिष्ट भाववृत्तीत आहे; तसाच तो एखादी घटना

किंवा अनुभव या संबंधीच्या मनाला खळबळून सोडणाऱ्या भावनात्मक प्रतिक्रियात आहे. भाव कवितेचा हा तर प्राणभूत घटक होयव. ही भावनात्मक प्रतिक्रिया नितळ म्हणजे कोणत्याही प्रासंगिक, तात्काळ म्हणजे ताजी, निर्मळ, प्रशंसा अशी असते. अंत:स्फूर्त, प्रातिभिक प्रतीतीसारखी असते.

**अनुभवाचा आनंद व उत्साह हे भावकवितेत व्यापलेले असते**

भावकवितेच्या केंद्रस्थानी ही भाववृत्ती असते, तर भाववृत्तीच्या केंद्रस्थानी कवीचे व्यक्तिमत्व असते. व्यक्तिमनाची अंतर्मुखता, आत्मनिष्ठा, अंत:प्रेरितता या विशेषांतून घडून येणाऱ्या कल्पनाधिष्ठीत प्रतिक्रियांतून भाववृत्तीला तिचे बळ, तिचे भारलेपण प्राप्त होते. या भाववृत्तीच्या प्रबलतेचे पर्यवासन मग वर उल्लेखिलेल्या उत्कटतेत होते.

भावकवितेच्या या वैशिष्ट्यांमुळे भावकवितेत संवेदनांना विशेष प्राधान्य मिळते. अमूर्त संकल्पनाऐवजी संवेदनाच्या आधारे वस्तूच्या नैसर्गिक गुणधर्माशी समरसता पावणे ही या भावृत्तीची एक सहज प्रेरणा बनून राहते. अनुभवांच्या 'साक्षात' प्रत्ययाचा ताजेपणा, उत्साह आणि आनंद या भाववृत्तीत भरून राहिलेला असतो.

**संवादी आंतरिक भाववृत्ती हे भावकवितेचे बळ असते**

भावोद्‌गारांसरशी स्फुरलेली शब्दांची सर्जक शक्ती भावकवितेने आपल्यात सामावून घेतली. भाषेची ही प्राचीन वैभव हे भावकवितेने सर्व काळात आपले एक प्राणभूत तत्व मानले. शब्दांचे नादमूल्य आणि या नादमूल्याच्या आधारे संघटित होणारी नादाकृती हीच भावकवितेची सांगितिक आकृती बनली. ही नादाकृती आशवाहक किंवा अर्थवाहक असते हा तिचा आणखी एक विशेष. हा भावाशय किंवा

भावार्थ मूर्त करण्यासाठी आदिकालीन गीताच्या भाषेची रूपकनिर्मिती आणि मिथनिर्मिती ही गुणभूत वैशिष्ट्ये भावकवितेने उचलली. किंबहुना प्रतिमा, प्रतीक, रूपक, मिथ ही भावकवितेच्या भाषेची व्यवच्छेदक लक्षणे होऊन बसली. सृष्ठीसंबंधीच्या घटना किंवा प्रतिक्रिया ह्या प्राचीन मानवाच्या अनुभवातील संवेदना, भावना, कल्पना यांना जाणीव वस्तुरूप देणारी सर्जक शक्ती या अर्थाने शब्द हा मुळातच एक व्यंजक रूप घेऊन, प्रतिमा म्हणूनच जन्माला आला असे म्हणता येईल. हीच सर्जक प्रवृत्ती भाषेत, रूपक, मिथ इत्यादी घटकांतून विस्तारली. जड, अचेतन वस्तुलाही आपण तो वृक्ष, ती वेल, ते फूल यावरून रूपकनिर्मिती ही भाषेत किती खोल भिनलेली असते हे लक्षात येते. रूपक म्हणजे या व्यंजक, प्रतिमात्मक भाषेचाच विस्तार होय. हेच मिथविषयीही म्हणता येईल. भावकवितेचे भाषेच्या या मूळ प्रकृतीशी असलेले भावकवितेचे खरे बळ भाववृत्तीशी संवादी असलेल्या आंतरिक लयीत असते. भावकवितेचे सर्वस्वी शब्दांर्गत नाद-ताल-लयीतून हे भावनिर्भर घटक संघटित होतात.

**भावकवितेची अनुभूती उत्साही व नैसर्गिक असते.**

भावकवितेच्या रूपसंघटनेत शब्द अपर्यायी बनतात तर अर्थ म्हणजे भावार्थ असीम व्यंजक बनतात. भावकवितेत शब्दाला समान शब्द क्वचितच आढळतो. अर्थाला अभिदार्थ किंवा वाच्यार्थ नसतो. "ऐल तटावर पैल तटावर" याऐवजी "या काठावर, त्या काठावर" अशी शब्दयोजना चालणार नाही. तसे केल्यास ती बालकवींची 'औदुंबर' कविता राहणार नाही. भाववितेतील नादसंघटना आशय वाहक असते असे म्हणण्याऐवजी नादसंघटनेशिवाय भावकवितेतील 'आशय'च उत्पन्न होऊ शकत नाही. आशयाला कवितेच्या दृष्टीने अस्तित्वच प्राप्त होत नाही असे म्हणणे संयुक्तिक

ठरेल. पर्यायी शब्दांनी तीच किंवा तशीच नादसंघटना साधणार नाही – म्हणजेच पर्यायाने कवितेचा आशयच निर्माण होणार नाही.

भावकवितेतील शब्दार्थसंघटनेत शब्दांचे भावार्थाशी विशिष्ट तऱ्हेचे आंतरिक नाते जुळलेले असते. येथे शब्द मुळातच एक विशिष्ट (पर्टिक्युलर) जाणीव येऊन अवतरतो. सर्वसामान्य (जनरल) अर्थ नव्हे. 'पाणी' शब्दा उच्चारताच $H_2O$ या शास्त्रीय संज्ञेच्याप्रमाणे पाण्याची केवळ निर्गुण, निराकार संकल्पना जाणवत नाही. एखादे तळे, समुद्र, जलाशय यासारखे दृश्य, घरामागची विहिर, काचेचा पेला अशासारखी आपल्या अनुभवातली वा कल्पनेतली 'विशिष्ट' वस्तू प्रतिमा होऊन मन: पटलावर उमटते. आणि जलाशयात खडा पडल्यावर पाण्यावर जशी एकातून एक विस्तारत जाणारी वलये काठापर्यंत पसरावीत तशी संशाप्रवाहात भावना, स्मृती, सहचारी, कल्पना (असोसिएशन्स) यातून उदभवणारी अर्थवलये मनाच्या क्षितीजापर्यंत पसरतात. भावाशयाला गडद, गहन, गूढ बनवतात.

ही भाषिक प्रक्रियाच वेगळी असल्यामुळे भावकविता उच्चतम पातळीवर पोहचतो. "जेथे जातो तेथे तू माझा सांगाती" अशी अनमोल अतुलनीय अर्थसुबोध वाटणारी, संत तुकारामंची काव्यपंक्ती ही आल्हादायक व मनमोहक ठरते हे तीच्यातील भाववाहकेच्या पातळीवरुन लक्षात येईल. भावकवितेची भाषिक वैभव संपन्न असीम असते. तिचे नियंत्रण नादलयींनी संघटित झालेल्या शब्दप्रतिमांच्या परस्परात गुंतलेल्या अर्थवलयातूनच केवळ होत असते. त्यातून भाव कवितेची आशयकृती घडत असते. भावकवितेतील अनुभूती एकात्म असते. उत्साही असणे ही एक तिची नैसर्गिक आविष्कार क्षमता असते.

**भावकवितेचे स्वरुप हे विशुद्ध आणि विमल असते** :

भावकवितेचा शब्दावकाश लहान असला तरी मोठा भावाशय तो व्यक्त करू शकतो, याचे मर्म कवीचे व्यक्तिमत्व (त्याची आत्मनिष्ठा), कवितेचे माध्यम आणि काव्यात्म अनुभूतीचे स्वरूप यात आढळेल.

भावना नेहमीच आपल्या स्वत:च्या असतात. आपल्या व्यक्तिमत्वाच्या त्या अविभाज्य अंश असतात. त्यांच्या व्यक्तिमनाशी निकटचा संबंध असतो. आपणास अंतर्मुख करण्याची शक्ती त्यांच्या ठिकाणी असते. भावकवितेला सर्वात मोठी शक्ती प्राप्त होते ती कवीच्या व्यक्तिमत्वाच्या या विशेषातून. भावकवितेचे भाषिक माध्यम (मूलद्रव्य) विचारात घेतले तरी शब्द आणि अर्थ यांत असलेले गूढ नाते, तसेच नाद, लय, प्रतिमा, रूपक, मिथ, सहचारी कल्पना इत्यादी घटकांच्या ठिकाणी मुळातच असलेली एक तऱ्हेची प्रसरणशीलता, भारलेपण यातून भावाशयाला संपन्नता प्राप्त होऊ शकते. भावकवितेत कालाची बंधने गळून पडतात, त्या अनुभवाला कालनिरपेक्ष स्वरूप (टाईमलेसनेस) प्राप्त होते.

भावकवितेच्या बंदिशीत अर्थ व शब्द त्यांच्या अत्यंत विशुद्ध आणि विमल स्वरुपात, निखळपणे संघटित झालेले आढळतात. भावकवितेत हे सारेच विशेष प्रत्येक वेळी उपस्थित असावयास हवे. कवितेची मुळ प्रकृती शोधताना आपणास याच घटकांकडे आणि त्यांनी सिद्ध केलेल्या कवितेच्या याच मूळ रूपाकडे वळणे भाग पडते. या मूळ रुपाला ललित निर्मितीच्या अन्य माध्यमांत पर्याय नाही. म्हणून भावकविता विशुद्ध आणि विमल स्वरुपात असते.

भावकविता 'वाङ्मयीन' म्हणजे शब्दार्थनिष्ठ झाली; बाह्य संगीतापेक्षा आंतरिक लयीकडे वळली; कवी, त्यांचे व्यक्तिमत्व, व्यक्तिमन, अंतर्मुखता, हे भावकवितेत घटक अवतरले आणि महत्त्वाचे म्हणजे एक स्वतंत्र आणि स्वायत्त

स्थान भाव कवितेने निर्माण केले. पूर्णांशाने शब्द आणि अर्थ यांच्या विविध शक्तीतूनच तिने आपले रूप संघटित केले.

भावकवितेचे स्वरूप देखील आदिकालीन गीताहून बदलत गेले. एका विशिष्ट अर्थाने 'सांकेतिक' असणे हे गीताचे एक वैशिष्ट्यच होऊन बसले. कारण लोकमानस किंवा जनमानस हे त्या निर्मितीचे केंद्रस्थान बनले. लोकमानस म्हणजे केवळ समुदाय किंवा समूहरूपी एक जड गोळा नव्हे. लोकमानस म्हणजे कोणत्याही समाजाचे सांस्कृतिक दृष्ट्या असलेले अस्तित्वच होय. भावकवितेत भाषेच्या बाबतीत ही सांस्कृतिक पार्श्वभूमी महत्त्वाची ठरते. हे एक सांस्कृतिक संचित असते. शब्द त्यात मुरलेले असतात. त्यामुळे त्या भाषेपासून अलग करता येणार नाही. असे ताल, लय इत्यादी संकेतही त्या भाव कवितेतल्या भाषेला चिकटलेले असतात. या विशेषांतूनच भावकवितेला चैतन्य शक्ती प्राप्त होत असते. भावकवितेत कविमन व उत्साहीत भावना हा त्या निर्मितीचा केंद्रबिंदू ठरतो. मनाचे भावविश्व मूर्त करणारी 'स्वतंत्र' शैली हा भावकवितेचा विशेष स्थायीभाव आहे. तरल, सूक्ष्म, व्यामिश्र आशय व्यक्त करायला तिच्यात औचित्य असते.

**भावकवितेतून कलात्मक जीवनाचा बोध होतो :**

भावकवितेत भावनांची अभिव्यक्ती, रस, अलंकार, अर्थ, कल्पनाशक्ती, सत्य आणि सौंदर्य आणि भाषा इत्यादी घटकांचा त्यात समावेश आहे. भाव कविता ही एक भाषिक संघटना असली तरी ती आशयवादी कलाही असते. त्यामुळे भाव कवितेच्या रूपाबरोबरच भाषा आणि आशयाला भाव कवितेत महत्त्व असते. अनुभवाला गोचर करण्याचे कार्य भाव कवितेची भाषा करीत असते. आशय आणि अभिव्यक्ती यांच्यातील अद्वैत भाव काव्याचे मोल वाढविणारे असते. अशा अभ्यासात भाषेच्या

विशिष्ट अर्थव्यंजक उपयोगाचा अधिक विचार केला जात आहे. प्रतिमा हे भाव काव्याचे महत्त्वारचे माध्यम समजले जाते. भावकवितेतून व्यक्त होणारा काव्यानुभव हा महत्त्वाचा असतो. त्यातून जीवन आणि कलामूल्यांचा प्रत्यय लाभत असतो.

**मानवी व्यवहार व्यापक करणारी कविता म्हणजे भावकविता :**

भाव कविता हा एक मौलिक काव्य प्रकार मानला जातो. भाव कविता विविध रुपाशी आपले सांस्कृतिक जीवनही निगडीत असल्याने तर ती महत्चाची ठरते. धर्म, शास्त्र, संस्कृती, कला मानवी मन व व्यवहाराची सर्व क्षेत्रे भाव कवितेने व्यापलेली होती.

## समारोप :

'Pure Poetic Energy' असे भावकवितेचे वर्णन केले जाते. उत्स्फुर्तता, उत्कटता, भावतल्लीनता हे भावकवितेचे महत्त्वाचे विशेष आहेत. भावकवितेचे छोटेखानी रूप घडविण्यात उत्कटतेचा महत्त्वाचा सहभाग असतो. उत्कटकता हा भावकवितेचा प्राणभूत घटक मानल्या जातो. भावकवितेचे हे उत्कटरूप सर्वस्वी शब्दार्थतून संघटित होत असते. भावकवितेत सर्वस्वी शब्दांतर्गत नाद, लय, ताल हे भावनिर्भर घटक संघटित झालेले असतात. त्यातूनच छंद, जाती, वृत्ते निर्माण झाली. भावकवितेत शब्दार्थ संघटनेतून शब्दांचे भावार्थाशी एक आंतरिक नाते निर्माण होत जाते. शब्दाला येथे सर्वसामान्य अर्थ राहत नाही तर व्यंजनार्थ प्राप्त होतो. आणि त्यामुळे कवितेला अर्थ लाभतो. भावकवितेचा शब्दावकाश लहान असला तरी तो मोठा भावाशय व्यक्त करू शकतो. मानवी मनाला प्रफुल्लीत व उल्हासित करण्याचे सामर्थ्य भावकवितेत असते.

# संदर्भ :


१) देशपांडे ग. त्र्यं. : भारतीय साहित्यशास्त्र

२) गाडगीळ स. रा. : काव्यशास्त्रप्रदीप

३) रसाळ सुधिर : कविता आणि प्रतिमा

४) संपादक: ढवले वा. रा. आणि कुलकर्णी व. दि. : मराठी कविता : प्राचीन कालखंड

५) राजाध्यक्ष विजया : कवितारती

६) डहाके वसंत आबाजी : कवितेविषयी